नियतकालीक बदल्या -२०२०
**बदली/नेमणूक/पदस्थापना**
उपअभियंता (विद्युत ) (गट-अ)

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ५१**
**आदेश क्र.प्राधि/बदली/२०२०/1045 /प्र.७**
**दिनांक :- 17/08/2020**

**संदर्भ** - कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांचे आदेश क्र. बदली -२०२०/प्र.क्र.५२/गृनिभू, दि.१०.०८.२०२०

**आ दे श**

कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांच्या दि.१०.०८.२०२० रोजीच्या संदर्भिय आदेशान्वये महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील तरतूदीनूसार व सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्याअंतर्गत सर्व विभागीय मंडळातील **उपअभियंता (विद्युत) (गट-अ)** या संवर्गातील सर्वसाधारण बदलीस पात्र असलेल्या अधिका-याची खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, बदलीने पदस्थापना त्यांच्या नावासमोर देर्शविलेल्या ठिकाणी बदलीने नेमणुक करण्यात आली आहे.

| अ क्र | अधिका-यांचे नांव | सध्या कार्यरत कार्यालय | बदलीनंतरचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रज्ञावंत चंदनखेडे | उपअभियंता/ नागपूर मंडळ | उपअभियंता/ नाशिक मंडळ | रिक्त पदी |

बदलीनंतर उक्त अभियंत्यास वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते अनुज्ञेय राहतील. तसेच सदर अभियंत्यास नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

उपरोक्त अभियंत्याने नविन पदाचा कार्यभार त्वरीत स्विकारावयाचा आहे, पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तसेच, बदली रदद करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास ते शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील, याचीही नोंद घ्यावी.

वरील अभियंत्यांस तात्काळ प्रभावाने कार्यमुक्त करण्यात येत आहे. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी पर्यायी अभियंता हजर होण्याची वाट न पाहता, बदली झालेल्या अभियंत्यांस तात्काळ कार्यमुक्त करावे व नवीन नेमणूकीच्या ठिकाणी तात्काळ रुजू होण्यास संबंधित अभियंत्यांस सांगावे.

बदली आदेशातील अभियंत्यास त्वरीत कार्यमुक्त न केल्यास त्यांचे वेतन मुळ विभागाच्या आस्थापनेवर काढता येणार नाही. तसेच, सदर अभियंता यांचे वेतन मूळ विभागाच्या आस्थापनेवर काढल्यास संबंधित विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल, याचीही नोंद घ्यावी.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने**

( राजकुमार सागर )
सचिव/प्राधिकरण.

प्रति,
**श्री प्रज्ञावंत चंदनखेडे, उपअभियंता/विद्युत/नागपूर मंडळ**
**(मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांचेमार्फत.)**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
३) विधी सल्लागार/प्रा.
४) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
५) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
६) मुख्य अधिकारी, नाशिक, नागपूर मंडळ
७) चौकशी अधिकारी/प्रा.
८) लेखा अधिकारी , नाशिक / नागपूर मंडळ
९) संचालक, पी.डी.सी. पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**प्रत:** प्रशासकीय अधिकारी -१,२ प्राधिकरण /नाशिक / नागपूर मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडीट सोसायटी लि., मुंबई

**प्रत:** प्रशासन-५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७/प्रा.
**प्रत,** निवडनस्ती, सचिव/प्राधिकरण

प्रत - CICT/प्रा